Maharashtra State Board of Secondary and Higher SecondaryEducation,
Kolhapur DivisionalBoard, Kolhapur-416004
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६००४.
Phones : Chairman 2690829 Secretary 2691405 PBX-2696101,2696102,2696103 FAX:[0231]2690758
E-Mail: divsec.kop@gmail.com Web : sscboardkolhapur.in

**परिपत्रक क्र.कोविमं/शाखा-उमा/फेब्रु/ 1685 दि.१७/११/२०२१**

**विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२० व नोव्हेंबर-डिसेंबर २०२० श्रेणीसुधार परीक्षेची गुणपत्रिका मिळण्यासाठी विकल्प सादर करण्यास देण्यात येणाऱ्या मुदतवाढीबाबत...**
**संदर्भ:- क्र.रा.मं./परीक्षा-८/६६१५ दि.१६/११/२०२१ रोजीचे पत्र.**

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, शासनाच्या दि.१५/११/२०२१ च्या पत्रान्वये कोविडमुळे उद्भवलेली परिस्थिती व विद्यार्थी हित पाहता, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२० व नोव्हेंबर-डिसेंबर २०२० परीक्षेस श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ठ झालेल्या व विकल्प सादर करु न शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष बाब म्हणून विकल्प सादर करण्यास दि.१५/१२/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

तसेच प्राचार्य सर्व कनिष्ठ महाविद्यालय यांना सुचित करण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/ मार्च २०२० व नोव्हेंबर-डिसेंबर २०२० परीक्षेस श्रेणीसुधार योजनेअंतर्गत आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातुन प्रविष्ठ झालेले विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्याशी संपर्क साधुन सदर परिपत्रक त्यांना अवगत करावे. दि.१५/१२/२०२१ नंतर आलेल्या प्रस्तावाचा कोणत्याही प्रकारे विचार करण्यात येणार नाही.

तरी, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२० व नोव्हेंबर-डिसेंबर २०२० परीक्षेस श्रेणीसुधार योजनेस आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातुन काही विद्यार्थी प्रविष्ठ असल्यास तात्काळ त्यांच्याशी संपर्क साधण्यात यावा.

**(देविदास कुलाळ)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख,
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

प्रत माहितीसाठी -
१) मा.शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सातारा/ सांगली/ कोल्हापूर.